
प्राण्यांच्या
मजेदार कथा
मीनाक्षी केतकर
परी प्रकाशन

प्राण्यांच्या मजेदार कथा

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.


**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये ८०/-

## अनुक्रमणिका

१. लाडोबा टिंग्या ............... ३
२. चातक पक्ष्याची गोष्ट ......... ८
३. हुशार उंदीर आणि त्याचे तीन शत्रू ११
४. जगाचा न्याय ............... १४
५. भोळा उंदीर व लबाड मांजर ... १९
६. कावळ्याची तक्रार .......... २३
७. मनोऱ्यावरचा कोंबडा ........ २६
८. शूर सनी ...................... ३१
९. चिंटूचा पपी .................. ३५
१०. त्यांच्या कैफियती ............ ४२
११. खट्याळ चंकी ............... ४७
१२. कावळा काळा का ? ......... ५२
१३. गर्वाचे घर खाली ............. ५७
१४. पाच शूरांची गोष्ट ............. ६२
१५. सिंहाला हवी छत्री ............ ६७
१६. गुणी कपिला .................. ७२
१७. मिशीमामा .................... ७६
१८. अहिंसक मनी ................ ८०
१९. आमचेपण संमेलन ........... ८३
२०. हट्टी कोकिळा ................ ८७
२१. फटूरावांची युक्ती ............ ९१
२२. राजा आणि राणा ............. ९५
२३. कोळ्याची धिटाई ............ १००
२४. जॉली डॉल्फिन ................ १०४



# लाडोबा टिंग्या

एका रानात एक वानरांचा कळप राहात होता. झाडावरची फळे खावीत, काही कुरतडून खाली टाकावीत. पोटभर फळे आणि बोरं, जांभळं यांचा खाऊ मिळायचा त्यांना. मात्र कधीतरी त्यांना माणसांच्या वस्तीत जायची लहर यायची. विशेषत: पापड, कुरड्या, सांडगे अंगणात गच्चीवर वाळत पडले की टोळीच्या टोळी गावात शिरायची.

एक वानरी होती. तिचे नाव 'बंगी'. तिला एक पिल्लू झाले. तशी आतापर्यंत तिला खूप पिल्ले झाली होती; पण ते पिल्लू जरा चमत्कारिक होते. एकतर ते सुरुवातीला खूप अशक्त होते, त्यामुळे बंगी त्याला खूप जपायची. त्याची काळजी घ्यायची. झाडावरून उड्या मारताना हे पिलू – 'टिंग्या' त्याचे नाव, तिच्या पोटाशी चिपकून असायचे. सर्वच वानरांची पिल्ले अशीच लहान असताना आईला चिपकूनच असायची पण हळूहळू ती स्वतंत्र व्हायची. एकट्याने उड्या मारायची; पण हे पिल्लू अजबच. आईचे पोट काही सोडेना. थोडे मोठे झाले तरी ज्या वेळेला इतर पिले झाडांवरून उड्या मारायला शिकायची ते वय झाले तरी हा टिंग्या आपला आईच्या पोटाशी !

इतर वानरिणी तिला म्हणाल्या, ''अगं, आता सोड त्याला स्वतंत्र. किती दिवस पोटाशी धरून बसणार आहेस ? मोठा झालाय आता तो. सोड त्याला.''

वानरीला पटत होतं. ती टिंग्याला म्हणायची सुद्धा ''बाळा, आता सोड रे मला. मोठा झालायस तू. तुझ्या बरोबरीची पिल्लं बघ झाडांच्या फांद्यांवरून वर कशी भराभर चढतात ते आणि स्वत:चं


अन्न स्वत: मिळवतात. मी किती दिवस तुझ्यासाठी खायला आणू रे ? आणि आता जड पण झालायस तू.''

टिंग्या आपल्या गोल डोळ्यांनी आईकडे बघायचा नि म्हणायचा, ''नाही गं आई, मला एकट्याला टाकू नकोस ना ! मला भीती वाटते. कोल्हा येतो, लांडगा येतो, कुत्रा भुंकतो... माझा किती थरकाप होतो ! मला कायम तुझ्याजवळच राहायचं आहे गं !''

असं म्हटलं आणि त्याच्या निरागस डोळ्यात पाणी पाहिलं की बंगी विरघळायची नि त्याला अधिकच पोटाशी धरायची. ''माझा लाडोबा तो !'' असे म्हणून लाड करायची.

टोळीतल्या सगळ्यांनी तिला सांगून पाहिलं – 'आता त्याला शिकायला हवं स्वतंत्रपणे राहायला. ती तुझी वेडी माया त्याचा घात करील. वेळीच वेगळं कर त्याला. इतक्या मोठ्या मुलाला कुणी पोटाशी बाळगतं का ? आम्ही शिकवतो त्याला स्वतंत्र राहायला.'

मग एकदा सगळी टोळी झाडाच्या फांदीवर बोरं खात बसली होती. खाली दोन कोल्हे आले. त्यांना पाहिल्यावर सगळी वानरं खालच्या फांद्यांवरून वरती भराभर उड्या मारीत चढली. टिंग्या आणि बंगी खालच्याच एका फांदीवर बसले होते. इतर वानरांनी बंगीला खेचत वर नेलं. तिचा जीव तुटत होता टिंग्यासाठी. ''बिच्चारा माझा टिंगू !'' मग ओरडून, किचकिचाट करून टिंग्याला बोलावू लागली; पण टिंग्या पार गडबडून गेला 'आई आई' म्हणून हाका मारू लागला; पण वरच्या फांदीवर उडी मारून जायचं काही त्याला सुचेना. तसाच घाबरून बसून राहिला.




आता कोल्हा उडी मारून त्याच्यावर झडप घालणार एवढ्यात बंगीचा धीर सुटला. ती धावत टिंगूजवळ आली. तिने झपकन् त्याला पोटाशी धरलं आणि ती वरच्या फांदीवर उड्या मारीत गेली. यावेळी

तिनं वाचवलं त्याला पण हा वेडोबा शिकणार तरी कधी नि कसं ? तिला त्याची फारच काळजी वाटू लागली.

एकदा कुणीतरी बातमी आणली – ''चला रे, गावात सगळ्यांच्या अंगणात, गच्चीवर पापड, सांडगे वाळत पडलेत. मेजवानीच आहे आपल्याला. चला, चला.'' मग त्यांच्यातल्या मुख्यानं सगळ्यांना आदेश दिला – ''चला पापड, कुरड्या खायला.'' सगळी टोळी गावात शिरली. झाडांवर, घरांच्या छपरांवर उड्या मारीत सगळीकडे नुसता धुडगूस घातला. सगळी माणसं त्यांना हाकलायला त्यांना दगड मारीत होती आरडाओरडा करत होती; पण वानरं त्यांना दाद देतात थोडीच ! माणसं जवळ आली की ती झाडावर चढायची. छपरावरून गच्चीवर उतरून मजेत सांडगे खात बसलेली वानरं त्यांना नुसते दात विचकून दाखवत आणि पळत छपरावर जात. तिथून वाकुल्या दाखवत. या भानगडीत अनेक कौलं फुटत होती.

बंगी आणि बाकी काही वानरं एका छपरावर बसून सांडगे खात होती. टिंग्या आईजवळ होताच; पण माणसं गच्चीत होती. छपरावर वानरं सुरक्षित होती. एखादा दगड यायचा पण वानरं चुकवायची. वानरांचं लक्ष नव्हतं पण छपराच्या मागच्या बाजूनं काही पोरं हळूच छपरावर चढली होती. वानरांना कळलंच नाही. जवळ आली तेव्हा धावपळ उडाली. सगळ्यांनी भराभर शेजारच्या छपरांवर उड्या मारल्या. टिंग्याला मात्र आईच्या पोटापर्यंत जाता आलं नाही. तो आईजवळ पोहोचला एवढ्यात एका पोरानं त्याची शेपूट पकडली आणि त्याच्या आईला हुसकावून लावलं. आई बंगी शेजारच्या छपरावरून पाहात होती.

पोरांनी टिंग्याचा ताबा घेतला. त्याला उचलून घेतलं आणि ते खाली उतरले. मोठ्या माणसांनी त्यांना सांगितलं त्याला



सोडून द्यायला; पण मुलं ऐकतात होय ? त्यांना खेळणंच मिळालं. टिंग्या खूप भेदरून टकटक बघत होता. बंगी कितीतरी वेळ दुसऱ्या छपरावर बसून बघत होती. तिच्या डोळ्यात पाणी आलं. त्याला स्वत:चं संरक्षण करायला सुद्धा आपण शिकवलं नाही याचा तिला पश्चात्ताप झाला. इतरांचं बोलणं चेष्टेवारी नेलं, लाडोबा करून ठेवलं त्याला; पण आता विचार करून काय उपयोग ? माझा टिंग्या परत मिळणं अशक्य.'

टिंग्या आता मुलांच्या हातात होता. मुलांना फारच मजा वाटत होती. कुणी त्याला खायला आणून देत होते. कुणी पाणी प्यायला बशी आणून दिली. टिंग्या प्रथम खूप घाबरला; पण मग कोल्हा लांडग्यांसारखी मुलं नाहीत हे त्याच्या लक्षात आलं. मग त्याची भीती दूर झाली.

पण ही मुलं त्याच्या गळ्यात दोरी बांधून आपल्याबरोबर त्याला फरफटत न्यायची; त्यामुळे टिंग्या कंटाळला. त्याला झाडांवरून उड्या मारायच्या होत्या. रानावनात भटकायचं होतं; पण ही मुलं त्याला मोकळं हिंडूच देत नव्हती.

इकडं आई बंगीला त्याचं काय होत असेल म्हणून काळजी. मग तिने त्या गावातच मुक्काम ठोकला. जिथं टिंग्या असेल तिथंच जवळच्या झाडावर ती असायची. टिंग्या मोकळा सापडला की त्याला पोटाशी धरून पळून जायचं असा तिचा बेत होता; पण मुलं त्याला बांधूनच ठेवीत. ती संधी बघत होती.

एके दिवशी एका मुलाच्या डोक्यात एक आयडिया आली.

''मला एक भन्नाट कल्पना सुचली रे !'' एकजण म्हणाला.

''काय, कसली भन्नाट आयडिया ? असेल काहीतरी फुसकी आयडिया.''

''नाही रे, आपण माकडवाल्यांचा खेळ बघतो तसे खेळ आपण याला शिकवू.''

''म्हणजे कसे ?''

''म्हणजे, स्टुलावर बसायचे, दोन पायांवर चालायचे, काठी टेकीत चालायचे असं काही शिकवता येईल.''

''शिकेल का पण हे पिल्लू ? जरा बावळटच दिसतंय !''

''बघू तरी प्रयत्न करून !'' सगळ्यांनाच ही कल्पना खूप आवडली. मग खेळ शिकवणे सुरू झाले.

त्याच्यासमोर स्टुलावर बसून हात मांडीवर ठेवायचे असं एकानं करून दाखवायचं, मग त्याला स्टुलावर बसवायचं, दुसऱ्यानं हात मांडीवर धरायचे... हे झालं की त्याला खाऊ द्यायचा. दोन-तीनदा हे शिकवल्यावर प्रत्येक वेळी खाऊ दिल्यामुळे टिंग्या हे शिकला. पुढे यानंतरचे धडे सुरू झाले. दोन पायांवर चालायचे शिकवणे सुरू झाले. त्याचे पुढचे दोन पाय

हातात धरून त्याला दोन पायांवर उभं करायचं, चालून झालं की खाऊ द्यायचा. मुलांचा उत्साह अतिशय वाढला. रोज नवं काही शिकवायचा मुलांचा बेत होता.

टिंग्याची आई झाडावरून सगळं पाहात असायची. तिला मुलाचे हाल बघून खूप वाईट वाटायचं. टिपं गाळायची ती. यातून याची सुटका कशी होणार ? आपला टिंग्या आपल्याकडे कधी येणार ? तिला समजत नव्हतं.

शेवटी ती टोळीच्या मुखियाकडे गेली. तिनं टिंग्याची सगळी हकीकत सांगितली. शेवटी सगळ्या वानरांच्या टोळीनेच त्याला सोडवायचं ठरवलं. एके दिवशी सर्व टोळी तिथं आली. झाडावर गुपचूप बसली. तसा मुख्य वानराचा आदेशच होता ना ! खाली मुलं आणि टिंग्या होते. टिंग्याला खेळ शिकवणं चालू होतं. मुख्यानं खूण केल्यावर संपूर्ण टोळी अंगणात उतरली. इतकी मोठमोठी वानरं दता विचकून मुलांच्या अंगावर धावून गेल्यावर मुलं घाबरली आणि दात पळून गेली. वानरांनी टिंग्याचा दोर कुरतडून टाकला त्याबरोबर टिंग्या आईच्या पोटाशी चिपकला. आईनं त्याला घट्ट पोटाशी धरले.

रानात आल्यावर मात्र आईने समजावले कारण आईलाही आता कळलं होतं. इतर वानरांनी पण टिंग्याला समज दिली आणि मग टिंग्या स्वतंत्रपणे उड्या मारू लागला. आईने त्याला पोटाशी धरणे बंद केले. आता टिंग्या पूर्वीसारखा आईच्या जवळ राहात नाही. कारण त्यालाही चांगलाच धडा मिळालाय. आता इतर पिल्लं आईच्या पोटाशी दिसली की तो त्यांना दम भरीत असतो.

✦✦

# चातक पक्ष्याची गोष्ट

एका जंगलात बरेच पशुपक्षी राहात होते. सुरुवातीला त्यांची संख्या थोडी होती; पण मग ती खूप वाढली. तसे खायला भरपूर होते. वेगवेगळी झाडे, त्यांची फळे, गवत हे काही प्राण्यांचे खाद्य होते. जंगल दाट असल्याने फळे खूप मिळत. पावसाळ्यात पाऊस भरपूर पडे. काही ठिकाणी पाणी साचून तळी होत. तळ्यावर तहान भागवायला सगळे प्राणी येत असत. हळूहळू प्राणी वाढले. त्यामुळे आणि कधी पाऊस कमी पडल्यामुळे पाण्याचे साठे संपू लागले. तळी कोरडी पडू लागली. उन्हाळ्यात तर खूपच त्रास होई.

तहानेने प्राणी व्याकूळ होऊन इकडेतिकडे हिंडू लागले. काही जणांच्या लक्षात आले, आपल्या जंगलात नदीच नाही. त्यामुळे आपल्याला पाणी मिळत नाही.

सगळ्यांनी मग एकत्र येऊन ठरवले, की आपल्याला नदी हवी; पण हवी म्हटल्याबरोबर नदी मिळणार थोडीच ? तेव्हा त्यांनी एका नदीलाच बोलवायचे ठरवले. सगळेजण डोंगरापलीकडच्या जंगलात गेले. तिथे एक नदी वाहत होती.

''नदीबाई, नदीबाई, आमच्या जंगलात येतेस का ? पाण्यावाचून आमचे खूप हाल होतात.'' प्राणी म्हणाले.

''कशी येऊ ?'' नदीने विचारले.

‘‘त्यात काय ! डोंगरांच्यामधून वाट काढून ये की.’’

नदीला हसू आले. ‘‘वेड्यांनो, मी खालून वर डोंगरावर कशी जाणार ? नाहीतर मी नक्की आले असते.’’

सगळेजण निराश झाले. मग नदीलाच त्यांची दया आली. ती म्हणाली, ‘‘वर डोंगरावर माझी एक बहीण राहते. अजून ती लहान आहे, म्हणून ती बाहेर पडलेली नाही. ती तुमच्याकडे यायला एखाद्या वेळेस तयार होईल. तिला विचारा.’’

सगळेजण मग तिच्याकडे गेले. ‘‘नदीबाई, नदीबाई, आमच्या जंगलात येतेस का ? आमच्याकडे नदी नाही. त्यामुळे आमचे खूप हाल होतात. तू येशील तर आम्हाला खूप आनंद होईल.’’

नदीबाई यायला तयार झाली. ती म्हणाली, ‘‘मी येईन. डोंगरातून बाहेर पडून सरळ खाली उतरेन; पण पुढं कसं यायचं ते मला तुम्ही सांगा. नाहीतर मी भलत्याच जंगलात शिरेन.’’

सगळ्यांनी विचारविनिमय केला. मग ते म्हणाले, ‘‘तू काळजीच करू नकोस. आम्ही मुळी तुझ्यासाठी प्रवाहाची जागा खणून काढू, खोलगट चर तयार करू म्हणजे तुला यायला सोपं, शिवाय आम्हाला जिथून नदी वाहायला हवी आहे तिथून प्रवाह वळवू.’’

सगळे कामाला लागले. नदीसाठी थोडेसे खोलगट पण रूंद पात्र तयार करू लागले. इवलेसे पक्षीसुद्धा चोचीने खणण्याचे काम करू लागले. चोचीतून माती नेऊ लागले.

ससा म्हणाला, ‘‘मी जरा पुढं जाऊन नदीच्या पात्राची जागा नक्की करून खुणा करतो.’’ ससा टुणटुणत निघाला; पण त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे सरळ न जाता वळणं घेत, वेलांट्या घेत, खुणा करत राहिला, त्याप्रमाणे बाकीच्यांनी नदीसाठी पात्र तयार केले, पण ते सरळ रेषेत नव्हते. त्याला खूपशी वळणे होती. नदीचे पात्र नागमोडी झाले. हे काम चालू असताना एक पक्षी मात्र झाडावर निवांत बसून राहिला. त्याला सर्वांनी बोलावले. कारण सगळे एकजुटीने भांडणे विसरून काम करीत होते.

गरुड त्याला म्हणाला, ‘‘अरे, इतकं चांगलं काम चाललं आहे, तूही सामील हो त्यात आणि घाबरू नकोस, मी किंवा कोणीच तुला खाणार नाही. ये खाली. शिवाय तुलाही पाणी लागेलच ना ?’’

‘‘मुळीच नाही लागणार. पाऊस एवढा पडतो तो मला पुरेसा आहे. तुमच्या या नदीचं पाणी प्यायला मी काही येणार नाही. त्यामुळे त्यासाठी मी काम करण्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही.’’

‘‘बघ हं. नंतर मागशील तर आम्ही देणार नाही.’’

‘‘नका देऊ. मला गरजच नाही नदीची.’’ तो पक्षी म्हणाला.

प्राण्यांचे काम संपले. नदी डोंगरातून खाली आली. पात्रातून वळणावळणाने वाहू लागली. पावसाळा आला. नदीला भरपूर पाणी आले. सगळे प्राणी आनंदाने नाचू लागले. नंतरच्या उन्हाळ्यात कधीच पाण्याची टंचाई जाणवली नाही. सगळ्यांची तहान भागून वर डुंबायला, डुबकी मारायला भरपूर पाणी मिळाले.

तो पक्षी मात्र उन्हाळ्यात तहानेने व्याकूळ झाला. सगळ्यांनी किती सांगितले, तरी नदीचे पाणी प्यायला आला नाही, तो फक्त पावसाची वाट पाहात राहिला. त्यामुळे त्याला ‘चातक’ किंवा ‘पावसाचा पक्षी’ म्हणू लागले.

✦✦